दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
• वर्ष १६ वे • अंक ३६३ • MAHMAR/2006/17212 • रायगड • बुधवार दि.३० मार्च २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# केंद्रीय तपास यंत्रणांच्या कारवाई विरोधात देशातील विरोधी पक्ष आक्रमक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या कुटुंबीयांवर केंद्रीय तपास यंत्रणांनी आतापर्यंत ११० धाडी टाकल्या आहेत. एकाच व्यक्तीविरोधात आणि त्याच्या कुटुंबीयांवर इतक्या धाडी पडण्याचा प्रकार आजपर्यंत तुम्ही बघितला आहे का, असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार (ड्ढरीरव झरुरी) यांनी उपस्थित केला. अनिल देशमुख यांच्या कुटुंबीयांवर ईडीने ५०, सीबीआयने ४० आणि प्राप्तीकर खात्याने आतापर्यंत २० धाडी टाकल्याचा उल्लेखही पवार यांनी केला. तसेच ममता बॅनर्जी यांच्या सल्ल्यानुसार आता विरोधी पक्ष केंद्रीय तपास यंत्रणांच्या कारवाईविरोधात एकत्र बसून रणनीती ठरवतील, असेही त्यांनी सांगितले. ते मंगळवारी नवी दिल्लीत आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात बोलत होते.




यावेळी शरद पवार यांनी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी बिगरभाजप राज्यांचे मुख्यमंत्री आणि विरोधी पक्षातील ज्येष्ठ नेत्यांना पाठवलेल्या पत्रासंदर्भातही भाष्य केले. ममता बॅनर्जी यांनी या पत्राच्या माध्यमातून काही सल्ले दिले आहेत. बिगरभाजप राज्यांनी एकत्र येऊन केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर रोखण्यासाठी काहीतरी ठरवले पाहिजे. रणनीती निश्चित केली पाहिजे, असे ममता बॅनर्जी यांचे म्हणणे आहे. त्यानुसार आता विरोधी पक्षाचे नेते संसदेत भेटून याविषयी चर्चा करतील,असे शरद पवार यांनी सांगितले. यावेळी शरद पवार यांनी 'द कश्मीर फाईल्स' या चित्रपटासंदर्भातही भाष्य केले. काश्मिरी पंडित विस्थापित झाले तेव्हा केंद्रात भाजपच्या व्ही.पी.सिंह यांचे सरकार होते. मुफ्ती मोहम्मद गृहमंत्री होते. तर काश्मीरचे राज्यपाल कोण होते, हे सर्वांनाच माहिती आहे. आज 'द कश्मीर फाईल्स' चित्रपटाच्या माध्यमातून इश्यू निर्माण करायचा प्रयत्न होत आहे. देशातील धर्मनिरपेक्षतेवर भाजपचा विश्वास नाही. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही, असेही शरद पवार यांनी सांगितले. काश्मिरी पंडित विस्थापित झाले हे देशासाठी चांगले झाले नाही. पण जे झालं ते विसरून समाजात एकोपा कसा राहील, हे पाहिले पाहिजे, असेही शरद पवार यांनी म्हटले.

# हिंद टर्मिनल बंद करण्याच्या प्रशासनाच्या हालचालीमुळे सुमारे ५०० कामगारांवर बेकारीची कुऱ्हाड



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील भेंडखळ गावाजवळ असणाऱ्या हिंद टर्मिनल ही कंपनी बंद करण्याचा घाट घातला जात आहे. त्यामुळे या कंपनीत काम करत असलेल्या ५०२ कामगारांवर बेकारीचे संकट कोसळले आहे. नुकतेच या कंपनीची मशनरी आणि साधन सामग्री बाहेर काढण्याचा प्रयत्न कंपनी व्यवस्थापनाने केला होता. मात्र संतप्त झालेल्या कामगारांनी आणि ग्रामस्थांनी हा प्रयत्न हाणून पाडला.

जोपर्यंत कामगारांची देणी देण्याबाबत ठोस भूमिका व्यवस्थापनाकडून जाहिर होत नाही तोपर्यंत येथिल एकही वस्तू कंपनीबाहेर जाणार नसल्याचा इशारा कामगार संघटनांकडून देण्यात आला आहे. उरण तालुक्यातील भेंडखळ ग्रामपंचायत हद्दीत १५ वर्षापूर्वी सीडब्लूसीच्या गोदामात हिंद टर्मिनल या कंपनीने कंटेनर हाताळणीचे काम सुरू केले होते.

या गोदामात विविध प्रकारच्या नोकऱ्यामध्ये येथिल ५०२ स्थानिक कामगार काम करत होते. मात्र सीडब्लसी सोबतचा १५ वर्षाचा करार संपल्यामुळे ३० एप्रिल पासून येथिल हिंद टर्मिनलचे कंटेनर हाताळणीचे काम बंद होणार आहे.त्यातच सीडब्लूसीने या गोदामाचे भाडे वाढविल्याने हिंद टर्मिनलने येथे काम करण्यास असमर्थता दर्शविली आहे. आणि ३० एप्रिलपासून येथिल कंपनी बंद करण्याची नोटीस कामगारांना दिली आहे.

कंपनी बंद पडल्यास १५ वर्षापासूनकाम करत असलेल्या ५०२ कामगारांचे .../२

# पिस्तूल विक्रीसाठी आलेल्या दोघांना कामोठे पोलिसांनी घेतले ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे वसाहत परिसरात गावठी बनावटीची पिस्तूल व जिवंत काडतुसे विक्री करण्यासाठी आलेल्या दोघा जणांना कामोठे पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तर त्यांचा तिसरा सहकारी हा अल्पवयीन मुलगा आहे.

कामोठे वसाहती मधील जवाहर इंडस्ट्रीयल परिसरात काही व्यक्ती पिस्तूल विक्रीसाठी येणार असल्याची माहिती वपोनी स्मिता जाधव यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक त्या परिसरात टेहाळणी करत असतात एक संशयीत रिक्षा त्या भागातून जात असताना दिसली. यावेळी सदर रिक्षा थांबवून रिक्षात बसेलले सराफुद्दीन आयुब शेख (वय २६), ऋषिकेश गायकवाड (वय २७) व सतरा वर्षीय अल्पवयीन मुलगा यानां ताब्यात घेऊन त्यांची झडती घेतली असता सराफुद्दीन यांच्याकडे देशी बनावटीची पिस्तूल तर ऋषिकेश यांच्याकडे ५ जिवंत काडतुसे आढळून आल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

# श्रीवर्धन शेखाडी मार्गे दिवेआगर या रस्त्याची अत्यंत दुरावस्था ; सा.बां.चे अक्षम्य दुर्लक्ष

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धनहून दिवेआगर कडे जाण्यासाठी समुद्रमार्गे रस्ता आहे. हा रस्ता श्रीवर्धन तालुक्यातील शेखाडी, भरडखोल या समुद्रकिनारी असलेल्या गावांमधून जातो. काही वर्षांपूर्वी हा रस्ता एक पदरी होता. परंतु सात ते आठ वर्षापूर्वी या रस्त्याचे दुपदरीकरण करण्यात आले.

श्रीवर्धनहुन दिवेआगर कडे जाताना, या रस्त्याने जाताना आपण गोव्यामध्ये फिरत आहोत की काय? असाच अनुभव आपल्याला मिळतो. डाव्या बाजूला पसरलेला अथांग निळ्या रंगाचा सागर व त्याच्याच बाजूने नागमोडी रस्ता असे या रस्त्याचे दृश्य आहे. श्रीवर्धन तालुक्यात येणारे पर्यटक आवर्जून या मार्गानेच दिवेआगरला जातात. किंवा दिवेआगर येथे आलेले पर्यटक श्रीवर्धन कडे येण्यासाठी याच मार्गाचा अवलंब करतात. परंतु मागील दोन वर्षापासून या रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली आहे. रस्त्यावर अनेक खड्डे पडलेले असून ते बुजविण्याच्या साठी देखील सार्वजनिक बांधकाम विभागाने दुर्लक्ष केल्याचेच पाहायला मिळत आहे.

श्रीवर्धनहून दिवेआगर कडे जाताना श्रीवर्धन जीवनेश्वर पारा पासून वाळवटी बंदर मोहल्या पर्यंत रस्ता नवीन बनवण्यात आला आहे. तर शेखाडी ते भरडखोल हा रस्ता पूर्णपणे खड्डेमय झालेला आहे. भरडखोल ते दिवेआगर हा तीन किलोमीटर मार्ग देखील नवीन करण्यात आला आहे. परंतु वाळवटी ते भरडखोल या रस्त्याचे नूतनीकरण का करण्यात येत नाही? हा प्रश्न गुलदस्त्यातच आहे. सदर मार्गावरती कोंडवील गावाचे हद्दीमध्ये एका पुलाचे काम सुरू असून दगडी असलेल्या भिंतींना बाहेरून काँक्रीटचा मुलामा देत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून थुकपट्टी लावण्याचे काम सुरू .../२

# मुंबई पुणे एक्सप्रेस वर करोडोची रोकड केली हस्तगत

## लोणावळा ग्रामीण पोलीसांची धडाकेबाज कारवाई

**दै.रायगड नगरी । अरविंद पोतदार**

**लोणावळा :** मुंबई पुणे एक्सप्रेस वर अवैध रोकड व शस्त्रासह एक मारूती स्वीप्ट कार सह करोडोची रोकड हस्तगत करण्यात लोणावळा ग्रामीण पोलीसांना यश आले.

याबाबत सविस्तर हकीकत अशी लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक प्रविण मोरे यांना एका गुप्त बातमीद्वारे माहिती मिळाली की, मुंबई पुणे एक्सप्रेस वर काही इसम अवैध रोकड व शस्त्रासह वरील ठिकाणावरून जाणार असल्याची माहीती मिळताच त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी एक पथक नेमले. सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास एक भरधाव स्पीप्ट कार क्र.केए ५३ एमबी ८५०८ ही संशयास्पद नजरेस सदर नेमलेल्या पथकास पडताच पोलिसांनी सदर गाडीस पोलीसांनी थांबण्याचा संदेश देऊन सदर गाडीची कसोशिने तपासणी केली असता एका चोर कप्प्यात तब्बल ४ करोड रूपयांची अवैध रोकड मिळून आले. सदर प्रकरणी गाडी चालक महेश नाना माने



रा. विटा जि.सांगली तसेच विकास संभाजी घाडगे रा.शेटफळ जि.सांगली यांची कसुन चौकशी केली असता सदर रोकड बाबत कुठून आणली व कुठे घेवून चालले होते त्याचे समर्पक उत्तर ते देऊ न शकल्याने तसेच त्यांच्याकडे याबाबतची कागदपत्रे नसल्याने पोलीसांना संशय अधिक बळावल्याने गाडीसह त्यांना ताब्यात घेवून याबाबतची माहिती पुढील कारवाई करिता तसेच याबाबतची अधिक माहिती घेण्याकरिता आयकर विभाग पुणे यांना कळविण्यात आले आहे.

सदर कारवाई पोलीस अधिक्षक अभिनव देशमुख, अप्पर पोलीस अधिक्षक मितेश घट्टे, उपविभागीय पोलीस अधिकारी लोणावळा राजेंद्र पाटील यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रवीण मोरे, उपनिरीक्षक सचिन बनकर, पोलीस उपनिरीक्षक लवटे, सहा.फौ.सिताराम बोकड, युवराज बनसोडे, पोलीस हवा.अमित ठोसर, महिला पोलीस नाईक पुष्पा घुंगे, गणेश होळकर, किशोर पवार, सिद्धेश्वर शिंदे,पो.ना.प्रणय उकीरडे यांनी केली. याबाबत लोणावळा ग्रामीण पोलिसांचे नागरिकांतून अभिनंदन केले जात आहे.

## संक्षिप्त...

# राज्यातील वीज कर्मचाऱ्यांचा संप मागे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

गेल्या २ दिवसांपासून महाराष्ट्रात सुरु असणाऱ्या वीज कर्मचाऱ्यांच्या संपाला अखेर स्थगिती मिळाली आहे. कर्मचारी संघटनेने याबाबत ऊर्जामंत्री नितीन राऊत यांच्याशी केलेल्या चर्चे नंतर ही घोषणा करण्यात आली आहे. ऊर्जामंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत समाधानकारक चर्चा झाली. वीज कंपन्यांचे खासगीकरण होणार नाही हे आश्वासन मंत्र्यांनी दिले आहे. त्यामुळे संप स्थगित करत असल्याचं वीज कर्मचारी संघर्ष समितीचे मोहन शर्मा यांनी म्हटलं.

या बैठकीनंतर मोहन शर्मा म्हणाले की, ऊर्जामंत्र्यांनी वीज कर्मचाऱ्यांच्या मागण्यावर सकारात्मक निर्णय घेऊ असं आश्वासन दिले आहे. पुढील ३-४ दिवसांत यावर कारवाई होईल. संपात सहभागी झालेल्या कुठल्याही कर्मचाऱ्यांवर कारवाई होणार नाही. बदली धोरणासंदर्भात एकतर्फी निर्णयावर विस्तृत निवेदन देतील. हायड्रोपॉवर स्टेशन खासगी कंपन्यांना देण्याबाबत चर्चा झाली.

चर्चा केल्याशिवाय बदली धोरण राबवणार नाही. कंत्राटी कामगारांना संरक्षण दिले जाईल. नोकरी भरतीत कंत्राटी कामगारांना संरक्षण द्यावं. २००३ च्या अमेंडमेंड बील राज्यानं केंद्राला कळवलं आहे अशी माहिती त्यांनी दिली.

# सामाजिक कार्याबद्दल आ.प्रशांत ठाकूर यांनी केले मते-पाटील कुटुंबियांचे कौतुक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवकर येथील मते-पाटील कुटुंबियांच्या वतीने गावामध्ये करण्यात आलेल्या समाजोपयोगी उपक्रमाचे भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी कौतुक केले. पनवेल तालुकयातील शिवकर गावातील मते-पाटील कुटुंबीयांनी सन २०१७ ते २०२१ पर्यत विविध सामाजिक उपक्रमे राबवली आहेत. त्याची माहिती अमित पाटील, संतोष मते, चिंतामण पाटील, मच्छिंद्र मते आदी मते- पाटील कुटुंबियांनी आमदार प्रशांत ठाकूर यांची सोमवारी (दि. २८) पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात सदिच्छा भेट घेऊन दिली. या सामाजिक कार्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी मते-पाटील कुटुंबियांना विशेष पुस्तक देऊन त्यांचा सत्कार केला तसेच त्यांना पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. अमित धर्मा पाटील यांचे वाढदिवस तसेच इतर औचित्य साधून शिवकर गावात विविध कार्यक्रमे आयोजित केले जातात. त्यामध्ये आतापर्यंत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंतीनिमित्त गणपती विसर्जन घाट लगतचे नदी पात्र स्वच्छ करण्यात आले. स्मशानभूमीची स्वछता, दिव्यांगांना जिल्हा रुग्नालयाकडून प्रमाणपत्र,



स्मशानभूमीचा चौथरा काँक्रीटीकरण, महामार्गाजवळ स्वछता, सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी शौषखड्डे, एनएसएस शिबीर, लोकसभागतून वृक्षारोपण, कब्रस्थान स्वछता, ग्राम स्वच्छता अभियान, गावात सीसीटीव्ही व अंडरग्राउंड केबल आणि ग्रामपंचायतीला एलईडी स्क्रीन दिली आहे असे विविध समाजोपयोगी उपक्रम मते- पाटील यांनी राबविले आहेत.

## अलिबागमध्ये आता सुसज्ज रिसॉर्ट पर्यटकांच्या भेटीला

# नागाव येथील समीरा पाल्म्स येथे ओसीयन पर्ल रिसॉर्ट सुरु

## पर्यटनाचा मनमोहक आनंद देणारे असे एकमेव रिसॉर्ट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आपल्यापैकी प्रत्येकजण कुठे ना कुठे तरी पिकनिकसाठी जाण्याचा बेत आखत असतात, मात्र कोणतं ठिकाण निवडायचं आणि कोणत्या ठिकाणी राहायला जायचं.... इथपासून आपली तयारी सुरु होते...... कधीकधी मित्रांच्या टोळक्यासोबत किंवा स्वतंत्र ग्रुप सोबत किंवा मग घरच्या मंडळींसोबत आपण सहलीचा आनंद लुटत असतो... पण जायचे कोठे ? हा प्रश्न पहिला मनात येतोच ना..... तुम्हाला माहीत नसलेली अनेक ठिकाणे आपण आपल्या दै.रायगड नगरी या वृत्तपत्राच्या माध्यमातून तुमच्यासमोर आणण्याचा प्रयत्न करीत आहोत.....

यामध्ये धबधबे, किल्ले, अथांग समुद्र आणि बीच, प्रायव्हेट बंगले/फार्म हाऊसेस् इत्यादींचा समावेश असणार आहे.... चाल.... तर, आज आपण भेट देत आहोत अलिबागमधील नागाव येथे सुसज्ञ असे उभे राहिलेले ओसीयन पर्ल रिसॉर्ट येथे.... आज आपल्या दर्शकांसाठी हि पर्वणी..... रायगड जिल्ह्याची अलिबाग ही राजधानी..... अलिबाग येथील पर्यटन अथांग सागरासारखे फोफावले आहे... अनेक हॉटेल्स आणि रिसॉर्ट्स याठिकाणी उपलब्ध आहेत.... त्यातच कुलाबा किल्ला आणि अथांग समुद्र किनारा लाभलेले असे शहर पर्यटनाच्या दृष्टीने मनमोहक स्वरूप प्राप्त करीत असते. त्यातच आता नव्याने सुदर अशा पाककृतींसह सुसज्ञ असे रिसॉर्ट पर्यटकांच्या भेटीला उभे राहिले आहे.... याठिकाणी १२ वातानुकूलित डिलक्स रूम, स्विमिंग पूल. आपल्या रूममधून अथांग समुद्राचे दर्शन अशा अनेक सोयीसुविधांयुक्त रिसॉर्ट पर्यटकांसाठी खऱ्या अर्थाने एक प्रकारची मेजवानीच ठरणार आहे.... तर आता आपली पिकनिक अलिबागमधील नागाव येथे असणाऱ्याओसीयन पर्ल रिसॉर्ट येथेच.....

याठिकाणी संपर्क साधण्यासाठी सत्येन तायडे यांच्याशी ९४२२२०४९४३ आणि ९३२५२०१३५५ या क्रमांकावर संपर्क साधून आजच आपली बुकिंग करा....

# खोपोली परिवहनच्या बसला झायलो गाडीची धडक



**दै.रायगड नगरी । खोपोली**

पाली खोपोली मार्गांवर अडलब इमेजिका, तारवाडी येथे मंगळवार दि.२९ मार्च रोजी सकाळी ११ : ३० च्या दरम्यान पाली हुन खोपोलीकडे जाणाऱ्या महेंद्र झायलो कार क्रमांक MH 06 -S 6393 या कारने खोपोली नगरपरिषद परिवहन बस क्रमांक MH 46 BM 1766 या बसला मागून जोरदार धडक देऊन अपघात झाला असून सुदैवाने कोणतीही .../२

# जलशक्ती अभियानांतर्गत पनवेल महापालिका क्षेत्रात जलसंवर्धनाचे विविध उपक्रम राबविणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जलशक्ती अभियानांतर्गत पनवेल महापालिका क्षेत्रात जलसंवर्धनाची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात येणार आहेत. राज्याचे मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव यांनी जिल्हाधिकारी ,आयुक्त व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी नुकताच व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून या कामांचा आढावा घेतला.



केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या नॅशनल वॉटर मिशनमार्फत देशासह राज्यात आजपासून आज (दि. २९ मार्च) ते ३० सप्टेंबर २०२२ याकालावधीत जल शक्ती अभियान' कॅच द रेन 'हे अभियान राबविण्यात येणार आहे. त्याचा शुभारंभ आज (दि. २९ मार्च) देशाचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते होणार आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्य सचिवांनी जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांशी संवाद साधत अभियानाबाबत आढावा घेतला. आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली या अभियानांतर्गत पनवेल महापालिका क्षेत्रातील विहिरींचा गाळ काढणे, विहिरी स्वच्छ करणे,आवश्यक ठिकाणी बोअर वेल काढणे,जुन्या बोअरवेल पुन्हा पुर्नजिवीत करणे, शासकिय,निमशासकीय इमारतीमध्ये रेन हार्वेस्टिंग करण्यात येणार आहे. खाजगी विकासकांना नव्याने बांधणाऱ्या गृह निर्माण संस्थांमध्ये रेन हार्वेस्टिंग करणे बंधनकारक असणार आहे. जलसंवर्धनाबाबत जलशपथ घेण्याचे आवाहन या अभियानांतर्गत करण्यात आले आहे.

या अभियानाच्या माध्यमातून पावसाळापूर्व व पावसाळ्यानंतरचे पाणी साठविण्यासाठी पालिका क्षेत्रात जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात येणार आहेत.

# खरी समस्या कोणती?

भारतात खासगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या तिन्ही स्वतंत्र असणाऱ्या; पण एकाच दिशेने जाणाऱ्या संकल्पनांचा खरा जोमदार प्रवास सुरू झाला, त्याला आता ३१ वर्षे उलटत आहेत. सन १९९०मध्ये भारताच्या तिजोरीतील सोने जागतिक वित्तसंस्थांकडे तारण ठेवण्याची वेळ आली होती. देश आर्थिक दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभा होता. पी. व्ही. नरसिंह राव आणि डॉ. मनमोहनसिंग या द्रष्ट्या जोडीने ते संकट निवारले. तेव्हापासून कोणतेही सरकार आले, तरी भारताचा प्रवास एका विशिष्ट दिशेने चालू आहे. डाव्यांचा पाठिंबा असणारे डॉ. मनमोहनसिंग यांचे पहिले 'यूपीए' सरकारही याच वाटेवर चालत होते. देशभरातील विविध कर्मचारी आणि कामगारांच्या संघटनांच्या महासंघाने व कृती समितीने दोन दिवसांचा जो देशव्यापी संप पुकारला आहे; त्यातली प्रमुख मागणी खासगीकरणाची प्रक्रिया थांबवा, हीच आहे. या संपात बँका, रेल्वे, विविध राज्यांची वीजमंडळे, काही वाहतूक संघटना असे लाखो संघटित कामगार सहभागी होत आहेत. यातल्या बँकांच्या संपाबद्दल सर्वसामान्य नागरिकांना बिलकुल सहानुभूती वाटत नाही. याचे मुख्य कारण त्यांना राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये सातत्याने येणारे वाईट व अपमानास्पद अनुभव. या संपात कोळसा, टपाल, पोलाद, तेल, दूरसंचार, विमा, प्राप्तिकर अशा विस्तृत क्षेत्रांमधील कामगार व कर्मचारी प्रत्यक्ष आहेत किंवा त्यांची संपाला सहानुभूती तरी आहे. देशातील नोंदणीकृत संघटनांचे; तसेच नोंदणीच नसलेले अशा सर्व मिळून वीस कोटी कामगार-कर्मचाऱ्यांच्या आयुष्यांना भिडणारा हा प्रश्न आहे, असे कामगार नेत्यांचे म्हणणे आहे. हा आकडा थोडा जास्त असला, तरी देशातील काही कोटी कर्मचाऱ्यांना खासगीकरणाच्या प्रक्रियेचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष स्पर्श होऊ शकतो. महाराष्ट्रापुरता विचार केला, तर वीज मंडळातून आधीच महानिर्मिती, महापारेषण आणि महावितरण या तीन कंपन्या जन्माला आल्या आहेत. त्यांचे खासगीकरण करू नका, ही कामगारांची मुख्य मागणी आहे. वीज कर्मचाऱ्यांच्या किमान ३६ संघटना आहेत. 'या कंपन्यांचे खासगीकरण होणार नाही,' असे आश्वासन देऊन, ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी 'संप करू नका' असे आवाहन केले आहे. हे आश्वासन आधी दिले असते, तर कदाचित या संपात हे कर्मचारी गेलेही नसते; मात्र यातला प्रश्न वेगळाच आहे. मुळात महामंडळ असताना, त्याऐवजी कामानुसार स्वतंत्र कंपन्या करण्याची आवश्यकता सरकारला का भासली असावी, हे समजावून न घेता ऐन उन्हाळ्यात राज्यातील काही कोटी ग्राहक, शेतकरी; तसेच विद्यार्थ्यांना आपण वेठीस धरता कामा नये, हा समजूतदारपणा निदान वीज कर्मचाऱ्यांनी दाखवायला हवा होता. आज हा संप होत असला, तरी ही वैचारिक किंवा तत्त्वप्रणालीची लढाई गेले तीन दशके चालूच आहे. गेल्या काही काळात मोदी सरकारने भांडवलविक्री, खासगीकरण आणि सरकारची उद्योगमाघारी यांत वेगाने पावले टाकली आहेत. नुकत्याच मिळालेल्या विधानसभा निवडणुकांमधील विजयामुळे याला आणखी वेग येऊ शकतो. गेली अनेक दशके रखडलेली एअर इंडियाची विक्री झाल्यानंतर, सरकारचा आत्मविश्वास वाढला असल्यास नवल नाही. गेल्या वर्षीच एका परिषदेत सहभागी होताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, 'गव्हर्न्मेंट हॅज नो बिझनेस इन बिझनेस' असे म्हटले होते. ते बऱ्याच प्रमाणात योग्य आहे; मात्र भारतासारख्या अवाढव्य लोकसंख्येच्या आणि गरिबीवर निर्णायक विजय न मिळालेल्या देशात सरकारला काही जबाबदाऱ्या सोडता येत नाहीत. उदाहरणच द्यायचे, तर पोस्ट व टपाल खात्याचे देता येईल. यातली 'पत्र' ही संकल्पना अनेकांना कालबाह्य वाटत असली, तरी या खात्याचे तेवढेच काम नाही. पोस्टाच्या पब्लिक प्रॉव्हिडंट फंड, अल्पबचत योजना किंवा अगदी स्पीड पोस्ट सामान्य नागरिकांसाठी महत्त्वाच्या आहेत. त्यासाठी पोस्ट खाते टिकायला हवे आणि त्यावरचे छुपे व उघड खासगी आक्रमण थोपवायला हवे. तीच गोष्ट काही प्रमाणात बँकिंगचीही आहे. सन १९६९मध्ये बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर, पुढच्या दशकभरात कृषी क्षेत्रासाठी झालेला पतपुरवठा कित्येक पटींनी वाढलेला दिसून येईल. देशातली हरित क्रांती राष्ट्रीयीकृत बँकांनी उचलून धरली होती. तेव्हा राजकीय हस्तक्षेपामुळे वाढणाऱ्या तोट्याकडे बोट दाखवून सर्व राष्ट्रीयीकृत बँकांचे खासगीकरण योग्य आहे का, याचा फेरविचार व्हायलाच हवा. याला दुसरीही बाजू आहे. 'राष्ट्रीय इस्पात निगम लिमिटेड'चा विशाखापट्टणम पोलाद उद्योग सातत्याने तोट्यात जात असून, संचित तोटा सात हजार कोटी रुपयांवर गेला आहे. आज हा संप तेथे यशस्वी झाला असला, तरी केंद्र सरकारने जनहिताच्या योजनांना पैसा कमी पडत असताना, तोटा सोसून पोलाद उद्योग का चालवायचा, याचे उत्तर कामगार संघटनांनाही द्यावे लागेल. यातली खरी समस्या प्रामाणिक उद्यमशीलता आणि राष्ट्रीय जबाबदारीचे भान असण्याची आहे. सरकारी, खासगी आणि सहकारी अशा तिन्ही क्षेत्रांमध्ये त्याची खरी वानवा आहे.

# तळा तालुक्यातील महावितरणाचे अधिकारी कर्मचारी संपावर

**दै.रायगड नगरी । तळा**

केंद्र सरकारच्या खासगीकरण धोरणाविरोधात देशभरातील वीज कर्मचाऱ्यांनी संपावर जाण्याची घोषणा केली आहे. २८ आणि २९ मार्च पासून सर्व वीजकर्मचारीसंपावर आहेत. विद्युत कर्मचारी आणि अभियंत्यांच्या राष्ट्रीय समन्वय समितीच्या झालेल्या बैठकीत हा मोठा निर्णय घेण्यात आला आहे.त्यानुसार तळा तळा तालुक्यातील अधिकारी आणि कर्मचारी हे दोन दिवस संपावर आहेत.या दोन दिवस वीज गेली तर तलेवसियांचे हाल होऊ शकतात.

देशभरातील कामगार संघटनांच्या आवाहनाला साद देत तळा तालुक्यातील वीज कर्मचारी या २ दिवसीय देशव्यापी संपात सहभागी झाले असल्याचे उपविभागीय अभियंता श्री महिंद्रकर यांनी सांगितले . वीज (सुधारणा) विधेयक २०२१ मागे घेण्यात यावे, सर्व प्रकारची खाजगीकरण प्रक्रिया थांबवण्यात यावी, या वीज कर्मचारी व अभियंत्यांच्या प्रमुख मागण्या आहेत. याच बरोबर, केंद्रशासित प्रदेशांमध्ये विशेषत: विजेचे खासगीकरण करण्याचा निर्णय रद्द करण्यात यावा आणि वीज मंडळे विसर्जित केल्यानंतर नियुक्त करण्यात आलेल्या सर्व वीज कर्मचाऱ्यांना जुन्या पेन्शनअंतर्गत आणावे अशी त्यांची मागणी आहे. महावितरणच्या या लाक्षणिक संपामुळे ग्राहकांना चांगलाच शॉक बसणार आहे. काही संघटनेचे कर्मचारी या संपात सहभागी नसल्याने काही प्रमाणात ग्राहकांना दिलासा मिळणार आहे.

# ना.सुभाष देसाई यांच्या स्थानिक विकास निधीतून उतेखोल येथे सभामंडप भुमीपूजन


**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**



महाराष्ट्र राज्याचे उद्योग आणि खनिकर्म, मराठी भाषा मंत्री नामदार सुभाष देसाई यांच्या स्थानिक विकास निधीतून १० लक्ष रुपये मंजुर झाले आहेत. या निधीतून माणगांव उतेखोल येथिल प्रांत कार्यालया जवळील वीर यशवंतराव घाडगे स्मारका लगतच बांधण्यात येत असलेल्या बहुउद्देशीय नविन सभामंडपाचे भूमिपूजन माणगांवच्या उपविभागीय अधिकारी श्रीमती. प्रशाली जाधव दिघावकर, तहसीलदार प्रियंका आयरे यांच्या शुभहस्ते मंगळवार दि. २९ मार्च रोजी सकाळी ११.०० वाजता करण्यात आले. याप्रसंगी माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष विष्णू रावसाहेब सावंत, उपाध्यक्ष विनायक कृष्णा चांदोरकर, सचिव ऋषिकेश एकनाथ शिंदे, माजी सैनिक सुरेश गायकवाड, माजी सैनिक श्याम सापळे, माजी सैनिक दीपक जाधव, सेवारत सैनिक विनोद उभारे आणि सैनिक पाल्य संजय घाडगे आदी मान्यवर उपस्थित होते.

# पाली येथील स्मशानभूमी व स्मशानभूमीकडे जाणारा मार्ग उजळला

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**



पाली स्मशानभूमीकडे जाणाऱ्या मार्गावर पथदिवे तसेच स्मशानभूमीला अनेक वर्षे वीज नसल्याने नागरिकांची गैरसोय होत होती. रात्री अंत्यविधी करतांना प्रचंड गैरसोय होत होती. मात्र नव्याने स्थापित नगरपंचायती मार्फत येथे विद्यूत रोषणाई करण्यात आली आहे.

स्मशानभूमीत दिवे नसल्याने अंत्यविधी करण्याची वेळ आल्यास खाजगी व वयक्तिक वाहानांचे दिवे सुरू करून किंवा हातात वीजेरी घेवून अंत्यविधी उरकले जात होते. या समस्येची दाखल घेत, नव्याने स्थापित झालेल्या नगरपंचायतीने कारभार हाती घेतल्यानंतर पाली येथील महत्वाच्या समस्यांना प्राधान्य देत नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष आरिफ मणियार यांच्या विशेष प्रयत्नातून स्मशानभूमीकडे जाणार्या मार्गावरील पथदिव्यांची तसेच स्मशानभूमितील विजेची सोय करण्यात आली आहे. विजेची सोय झाल्याने गा-वातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# धाकटे वेणगाव येथील रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे



**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील धाकटे वेणगाव येथील रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे, सदर ठेकेदार याच्यावर कारवाई करावी त्याचे बिल अदा करू नये अशी मागणी एका निवेदनाद्वारे ग्रामस्थांची केली आहे.

धाकटे वेणगाव यथे डोंगरी विकास अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रीटीचे काम करण्यात आले आहे, परंतु काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे, हा रस्त्याची एक महिन्याच्या आत चाळण झाली आहे, त्यामुळे ग्रामस्थांनी रायगड जिल्हा परिषदेचे उपअभियंता कर्जत यांच्या कडे लेखी स्वरूपात तक्रार केली आहे. त्यानंतर इंजिनियर जाग्यावर येवून पहाणी करून गेले होते. परंतु काल दि.२८ मार्च रोजी सकाळ पासून रस्त्यावर पाणी मारून साफसफाई चालू करून वरच्या वर डागडुजी केली आहे.

ग्रामस्थांची मागणी आहे की सदर ठेकेदारावर कारवाई करून नवीन रस्ता बनवून दिल्या शिवाय त्याचे बिल अदा करू नये. अन्यथा आम्ही ग्रामस्थ तीव्र आंदोलन करू असे निवेदनात नमूद केले आहे.

# शारिरीक अपंगात्वावर मात करीत पनवेलमधील एका तरुणाने गाठले यशाचे शिखर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शारिरीक अपंगत्वावर मात करीत पनवेलमधील एका तरुणाने यशाचे शिखर गाठताना इंटरनेट मार्केटींग, एरलिक मिडीया या कंपनीची स्वतः स्थापना करून त्यात घवघवीत यश मिळविल्याने त्याचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.



पनवेलमधील मध्यमवर्गीय कुटुंबियात वास्तव्यास असलेला परिक्षित शहा याला जन्मतः शारिरीक अपंगामुळे दुसर्याच्या आधाराशिवाय जागेवर थोडाही हलू शकत नव्हता. असे असले तरी शिक्षणाची आवड व ध्यास याच्यावर त्याने अपंगात्वावर सुद्धा मात करीत अंथरुणावर पडूनच आजपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले आहे. परिक्षित शहा नुसताच पास न होता दहावीच्या परिक्षेत हा घवघवीत यश मिळवून पुढे आला. त्याची हाडे ठिसूळ असल्यामुळे तो स्वतःच्या पायावर कधीही उभा राहू शकणार नव्हता. त्याला ऑस्टिओजेनेसिस नावाचा आजार असल्यामुळे तो त्याच्या आईच्या आधाराशिवाय एका जागेवरुन दुसर्या जागेवर हलू शकत नव्हता, असेही असताना त्याने दहावी व बारावीची परिक्षा चांगल्या श्रेणीत पास होवून तो यशस्वी झाला. शिक्षणाची मुळातच आवड असल्याने पुढे त्याने २०१७ ला पुणे युनिव्हर्सिटीमधून एम.ए. इकॉनॉमिक्स पूर्ण केले. आणि त्याच वर्षी मुंबई युनिव्हर्सिटीमधून पी.एच.डी.ची प्रवेश परिक्षा पण उत्तीर्ण केली.

त्याच दरम्यान त्याने व त्याचा सहकारी चिन्मय शर्मा (गुवाहाटी) यांनी मिळवून २०१८ ला एरलिक मिडीयाची सुरूवात केली. व सध्या तो पूर्णवेळ यात काम पाहत आहे. पुढे त्याने पी.एच.डी.सुरू केली नाही. कारण त्याचे काम आणि कंपनी या दोघांना पुढे घेवून जाणे महत्वाचे आणि व्यवहार्य वाटलं. आता चार वर्षानंतर मागे वळून पाहताना आपण घेतलेला निर्णय योग्य होता याचा आनंद परिक्षित शहाला आहे. एरलिक मिडीयामध्ये त्याने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कंपनीचे ऑनलाईन मार्केटींगचे काम ते बघत आहेत. गेल्या चार वर्षात त्याने अनेक कंपन्या, सेलिब्रिटी, पॉलिटीकल पार्टी आणि छोट्या व्यावसायिकांची कामे केली आहेत.

त्यामुळे त्यांची कंपनी देशातील अशा काही कंपन्यांमध्ये आहे ज्यांच्याकडे ऑनलाईन मार्केटींगमध्ये सगळ्या सुविधा उपलब्ध आहेत. वडिलांचे छत्र लहानपणी हरविल्यानंतर त्याची आई विजयालक्ष्मी शहा यांनी घरी टेलरिंगची कामे केली. परंतु २०११ पासून त्यांना मायग्रेन आणि ब्लडप्रेशरचा त्रास सुरू झाला. त्यानंतर त्यांची तब्येत बिघडल्याने त्यांनी आता पूर्णपणे काम बंद केले आहे आणि त्या घरीच असतात. अशा परिस्थितीत सुद्धा त्याने आपले शिक्षण पूर्ण केले व आगामी काळात सुद्धा अशाच प्रकारे कंपनीचा व्यवसाय देशभरासह परदेशात सुद्धा वाढविण्याचा मानस त्याने व्यक्त केला आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## प्रशासनाच्या हालचालीमुळे सुमारे ५०० कामगारांवर बेकारीची कुऱ्हाड

आणि त्यांच्या कुटूंबावर उपासमारीचे संकट कोसळणार आहे.अगोदरच या गावाला रोजगार आणि नोकरी शिवाय कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही त्यामुळे कामगारांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.त्यामुळे नुकतेच कामगारानी कंपनीची सामुग्री अडवून ठेवली होती. त्यानंतर व्यवस्थापनाने सर्वपक्षीय समितीच्या माध्यमातून आंदोलन केल्यानंतर कामगारांच्या मागण्यासाठी लवकरच बैठक बोलावण्यात येईल असे कंपनी प्रशासनाकडून कामगारांना सांगण्यात आले आहे.

## श्रीवर्धन शेखाडी मार्गे दिवेआगर या रस्त्याची अत्यंत दुरावस्था

आहे. तरी श्रीवर्धनच्या आमदार, रायगडच्या पालकमंत्री व राज्याच्या पर्यटन राज्यमंत्री आदिती तटकरे या रस्त्याच्या दुरावस्थे कडे लक्ष देतील का? असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

## खोपोली परिवहनच्या बसला झायलो गाडीची धडक

जीवित हानी झाली नाही मात्र झायलो कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे दिसून येत आहे.

पाली खोपोली रस्त्याचे काम हे मागिल अनेक वर्षांपासून सुरू असून या रस्त्यावर अनेक ठिकाणी काम अपूर्ण स्थितीत असून या मार्गावर अर्धवट ठेवण्यात आलेल्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे सुरक्षे विषयी ब्यारेकट व सुचना फलक लावण्यात न आल्याने वाहन चालकांना रस्त्याचा अंदाज न आल्याने या मार्गावर नेहमीच अपघात होत असतात.तसेच येथे मोठी जीवितहानी झाल्यावर ीीवल चे अधिकारी लक्ष देणार का? बेजबाबदार ठेकेदाराला रस्त्याचे काम करतांना सुरक्षा हेतूचे नियम लागू नाही का? असा संतप्त सवाल प्रवाशी वाहन चालक व नागरिकांन मधून व्यक्त होत आहे.

वकील : श्री.मितुल चं. लव्हेकर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील सह दिवाणी न्यायालय व.स्तर
मा.ए.ए.गोडसे सो., पनवेल यांचे कोर्टात

स्पे.मु.क्र.४५३/२०२१
नि.नं.४४/ड

**मे.एम.के.एन्टरप्रायजेस तर्फे**
**श्री.कांतीलाल हंसराज भानुशाली** — **वादी**
**विरुद्ध**
**मे.सनशान एन्टरप्रायजेस तर्फे**
**श्री.अनिल आनंद फडके आणि इतर** — **प्रतिवादी**
**प्रती,**
**श्रीमती.सुंदर अंकुश केणी**
**रा.चिंचपाडा, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**
**श्रीमती.मंजुळा सुधाकर म्हात्रे**
**रा.सह्याद्री अपार्टमेंट, खांदा कॉलनी,**
**तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

वरील अर्जदार **श्री.कांतीलाल हंसराज भानुशाली** ह्यांनी सदरचा स्पेशल मुकदमा प**नवेल येथील दिवाणी न्यायालय व.स्त.** यांचे कोर्टात वर नमूद प्रतिवादी **मे.सनशान एन्टरप्रायजेस तर्फे श्री.अनिल आनंद फडके आणि इतर** यांच्या विरुद्ध दाखल केलेला आहे. सदरच्या स्पेशल मुकदमामध्ये नमूद **श्रीमती.सुंदर अंकुश केणी व श्रीमती.मंजुळा सुधाकर म्हात्रे** यांना प्रतिवादी क्र.९ व १० बनविण्यात आले आहे. आपल्याला पारंपारिक पद्धतीने नोटीसीची बजावणी करता येत नसल्यामुळे वैकल्पीक सर्व्हिसचा वापर करत आहोत.

सदरचा स्पेशल मुकदमा वादीने तुमच्या आणि अन्य इसमांच्या विरुद्ध दाखल केलेला आहे. तसेच आपल्याला सदरचे नोटीस बजाविण्यात येत आहे तरी आपण स्वतः किंवा वकीलामार्फत आपली बाजू मांडण्याकरिता दि.२६/०४/२०२२ रोजी सकाळी १० वा.३० मि. न्यायालयात हजर रहावे. तसेच आपण आपल्या म्हणणे मे.न्यायालयात सर्व कागदपत्रांसहीत दाखल करावे.

तसेच सदरच्या नोटीसीची आपण गांभीर्याने दखल घेवून मे.न्यायालयात आपले म्हणणे सर्व कागदपत्रांसहीत दाखल करावे. जर आपण मे.न्यायालयात सर्व कागदपत्रांसहीत हजर राहण्यास असमर्थ राहिल्यास आपल्या विरुद्ध सदरचा स्पेशल मुकदमा एकतर्फी चालविण्याचा आदेश पारित होईल याची आपण नोंद घ्यावी.

आज दि.२९/०३/२०२२ रोजी माझ्या सही आणि शिक्क्यासहीत देण्यात येत आहे.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

Mujawar Judge
**Adv. Mangesh Nerpagare**

**PUBLIC NOTICE**

IN THE COURT OF CIVIL JUDGE S.D.PANVEL
AT PANVEL
MISC.APPLICATION NO.1950 OF 2021
Exh : 8/D
Next Date : 14/06/2022

Shri Pankaj Gopaldas Murjwani
Adult, Indian Inhabitant, aged about 42 years,
R/at : Flat No.G-1, Building No.C-3,
Mohan Puram, Kansai Section,
Ambernath (E), Dist-Thane — Applicant
V/S.
1) Shri Gopaldas Khatanmal Murjwani,
Adult, Indian Inhabitant, aged about 75 years,
2) Shri Vinod Gopaldas Murjwani
Adult, Indian Inhabitant, aged about 37 years,
Both R/at : Flat No.G-2, Building No.C-3,
Mohan Puram, Kansai Section,
Ambernath (E), Dist-Thane
3) Smt.Saakshi Rakesh Jiandani
Adult, Indian Inhabitant, aged about 43 years,
R/at : Shital Darshan, Flat No.7,
G.V.Scheme Road No.4,
Near Municipal Hospital, Mulund (E),
Mumbai-400081 — Non Applicants

**TO WHOMSOEVER IT MAY CONCERN**

WHEREAS, the applicant abovenamed has moved this court by way of M.A. for grant of heirship certificate or in the alternative for grant of letters of administration in respect of Estate as described in Schedule written hereunder of LATE SMT.ASHA GOPALDAS MURJWANI who died intestate on 03/05/2019 at Ambernath.

Therefore, it is noticed to all interested persons, they may file objection, if any to the grant of prayer of petitioner for heirship certificate or letters of administration of the Estate of deceased, whithin 30 days from the date of publication of this notice, through their advocate or in person, before this Hon'ble Court and if within the said period no objection is received, then the court will proceed to decide the petition in the absence of such objection.

**SCHEDULE OF PROPERTY**

50% SHARE IN FLAT NO.402 ON 4 TH FLOOR, K.K.SOLITARE, CONSTRUCTED ON PLOT NO.111, SECTOR-20 AT VILLAGE : ULWE, NAVI MUMBAI (MAHARASHTRA) AREA ADM 27.19 SQ. METERS BELONGS TO DECEASED : SMT.ASHA GOPALDAS MURJWANI.

Given under my hand & seal on the Court on this 29 day of 03/2022

**Sd/-**
**Jr.Clerk**
**Panvel Court,**
**Panvel**

Court Seal

**Sd/-**
**Asst.Superitent.**
**Panvel Court,**
**Panvel**

Mujawar Judge
**Adv.Sujata J. Patil**

**PUBLIC NOTICE FOR HERESHIP CERTIFICATE**

**IN THE COURT OF HON'BLE C.J.S.D. PANVEL AT PANVEL**

**M.A.No.421/2022**
**Exh : 8/D**
**Next Date : 05/05/2022**

Whereas decreased **LATE JABIR MOHAMMED MANSOORI** Hindu, Inidan Inhabitant, residing at the time of her death at **Kharghar, Navi Mumbai, Taluka Panvel, Dist Raigad,** WHEREAS **SMT. SAFIYA MANSURI, MR.NADEEM MOHAMMED MANSOORI, MR.HAMZA MOHAMMED MANSOORI AND MR.RAFI MOHAMMED MANSOORI,** benificiary all Residing at- **Flat No.1003, A Wing, Goodwill Paradise, Plot No.24, Sector-15, Kharghar, Taluka-Panvel, District-Raigad, Maharashtra-410210.** application for Heirship Certificate of Property to The Court Of Hon'ble C.J.S.D. Panvel At Panvel, At Panvel for the purpose of faithfully administer the property of the said deceased and in nay way connecting his.

Details of the property included in the properties mentioned in the schedule written herein under.

**SCHEDULE OF PROPERTY**

**Flat No.1003, A Wing, Goodwill Paradise, Plot No.-24, Sector-15, Kharghar, Taluka-Panvel, District-Raigad, Maharashtra-410210. Admeasuring Area-96.61 Sq.Mtrs. Carpet Area + 10.326 Sq.Mtrs. Terrace Area**

This is to give notice to all person who may have objection to his Heirship Certificate Application may appear in THE COURT OF Hon'ble C.J.S.D. Panvel, At Panvel within one month (30 days) from the date of this proclamation, there to entire their objection, and it is hereby declared that if no sufficient objection is offered before the expiration of that period, the Judge Of The Hon'ble Court C.J.S.D. Panvel, At Panvel will forthwith procced to receive proof if the said **SMT.SAFIYA MANSURI, MR.NADEEM MOHAMMED MANSOORI, MR.HAMZA MOHAMMED MANSOORI** AND **MR.RAFI MOHAMMED MANSOORI** right, and to grant her provided she shall appear to entitle thereto, a certificate of Heirship Certificate of the said deceased **LATE JABIR MOHAMMED MANSOORI.**

Date : 29/03/22

**Sd/-**
**Jr.Clerk**
**C.J.S.D. Court**
**Panvel**

Court Seal

**Sd/-**
**Asst.Superitent.**
**C.J.S.D. Court**
**Panvel**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## मनातील भावनेप्रमाणे फळ मिळते : महंत विवेकानंद शास्त्री

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

मनात ज्या भावना दडलेल्या असतात,त्याप्रमाणे आपणास फळ मिळते. अशाप्रकारचे भक्तीमय मार्गदर्शन ह.भ.प.महंत विवेकानंद शास्त्री,सिद्धेश्वर संस्थान कासार शिरूर यांनी आपल्या किर्तनसेवेप्रसंगी केले.

रोहे तालुक्यातील खांब पंचक्रोशी अंतर्गत धानकान्हे या गावी संपन्न होत असलेल्या ६५ व्या अखंड हरिनाम सप्ताह प्रसंगी आपल्या किर्तनरूपी सेवेप्रसंगी उपस्थित भाविक भक्तांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.या सप्ताह सोहळ्यात संपूर्ण रोहे तालुक्यासह रायगड जिल्ह्यातून मोठ्या संख्येने भाविक भक्तांची अक्षरशः मांदीच आली आहे. तर समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींही मोठ्या संख्येने उपस्थिती नोंदवून हरिनामाचा लाभ घेत आहेत. यावेळी पुढे प्रबोधन करताना कर्माचा योग्य वापर केल्याने फळ चांगले मिळते. म्हणून आयुष्यात नेहमी चांगले कर्म करून जीवन सार्थकी लावण्यासाठी जीवनात परमार्थाला महत्त्व देणे गरजेचे असल्याचे शेवटी मार्गदर्शन केले.

## वीर वाजेकर महाविद्यालयात विद्यार्थीनींसाठी समुपदेशन कार्यक्रम

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील फुंडे येथील ए,एस,सी महाविद्यालयात विद्यार्थिनींसाठी विशेष समुपदेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यत आले होते.त्यावेळी विद्यार्थिनींना रक्त तपासणी रिपोर्ट,रक्त व हिमग्लोबीनवाढी साठी मोफत गोळ्याचे वाटप करण्यात आले. सदरचा कार्यक्रम हा जागतिक महिलादिन निमित्ताने त्यावेळी आयोजित करण्यात आलेल्या रक्त तपसणी शिबिरा नंतरचा भाग म्हणून समुपदेशन कार्यक्रम ठेवण्यात आला होता.

या कार्यक्रमात,प्रमुख पाहूण्या म्हणून उपस्थित असणाऱ्या कम्युनिटी हेल्थ ऑफिसर डॉ.मोनाली चासकर यांनी विद्यार्थिनींना रक्त, हिमग्लोबीन, लोह. कॅल्शियमयाचा आपल्या शरीराल असणारा उपयोग त्याची आवश्यकता व त्याचेशरीरातील योग्य प्रमाण राखण्यासाठी घ्व्याची काळजी याबाबत सखोल मार्गदर्शन केले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.जी.पवार यानी विद्यार्थिनीनी आपल्या आरोग्याला प्राधान्य देणे का आवश्यक आहे हे नमूद करून भविष्यात विध्यार्थिनीना आरोग्यविषयी सल्लादेण्या साठी महाविद्यालय पातळीवर आरोग्यसल्लाकेंद्र स्थापन करण्याचे मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्तविक प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आमोद ठक्कर यांनी केले तर प्राचार्यांनी पाहुण्यांचे स्वगत केले,डॉ.राहुल पाटील यांनी प्राचार्यांचे स्वगत केले प्राध्यापक पी.टी.भोये यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ.श्रेया पाटील यांनी केले कार्यक्रम यशस्वी होण्या साठी डॉ.आर. एस.जावळे,प्राध्यापक संतोष देसाई,प्राध्यापिका दिक्षीता यांनी परिश्रम घेतले.



# कॉलनी फोरमची मालमत्ता करबाबत विधानसभा सभापतींच्या दालनात बैठक

### सभापती रामराजे निंबाळकर यांनी वाढीव, डबल मालमत्ता कराचा समजून घेतला विषय

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगर पालिकेने लावलेला दुहेरी कराबत पनवेल मधील कॉलनी धारक नाराज आहेत. मालमत्ता कराचा तिढा सुटता सुटत नाही आहे. अशात एकमेव कॉलनी फोरम अवाजवी, बेकायदेशीर आणि अन्याकारक मालमत्ता कराच्या विरोधात लढत आहे. आणि सत्ताधारी मात्र मूग गिळून राजकारण करत आहे. हा कर कसा कमी होईल यासाठी कॉलनी फोरम सर्वोत्तपरी प्रयत्न करत आहे . आजही कॉलनी फोरमच्या अध्यक्षा आणि समन्वयकांनी विधानपरिषद सभापती यांच्या दालनात आमदार बाळाराम पाटील यांच्या उपस्थितीत मालमत्ता कराच्या विषयावर बैठक झाली. ह्या बैठकीस नगरसेविका लीना गरड अणि कॉलोनी फोरमचे प्रतिनिधी अनिता भोसले, मधू पाटील, मंगेश अढाव अणि बालेश भोजने उपस्थित होते. जनतेला दिलासा देण्यासाठी कर भरण्याची मुदतवाढीचा निर्णय ३१मार्च च्या आधी देण्याची विनंती फोरमच्या वतीने सभापती महोदयांना करण्यात आली. लवकरच यावर निर्णय घेण्यात येईल आणि जनतेला दिलासा मिळेल असा विश्वास सभापती महोदयांनी दिला.



पनवेल महानगरपालिकेमधील सत्ताधारी आणि प्रशासन यांनी महानगरपालिकेमधील मालमत्ताधारकांवर अन्यायकारक अवाजवी बेकायदेशीर आणि मागील पाच वर्षाचा दुहेरी कर जनतेवर लादलेला आहे. याविरोधात कॉलनी फोरमच्या लीना गरड यांच्या नेतृत्वाखाली कॉलनी फोरमची टीम गेल्या दीड वर्षापासून आंदोलन, बैठका, स्वाक्षरी मोहीम, मोर्चे काढत आहे उपो-षणाला बसत आहे. याशिवाय राज्य शासनाकडे यामधून काहीतरी निर्णय घ्यावा यासाठी प्रयत्न करत उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच नगर विकासमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सोबत २ वेळा बैठकही झाल्या. तसेच बेकायदेशीरपणे लावलेल्या मालमत्ता करप्रणाली विरोधात उच्च न्यायालयातही याचिका केली आहे.

त्या अनुषंगाने आज दिनांक २९ मार्च रोजी नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे साहेब आणि संबंधित यांच्याबरोबर विधानपरिषद सभापती श्री. रामराजे निंबाळकर ह्यांच्या दालनात बैठक लावण्यात आलेली होती. महानगरपालिकेतील मालमत्ताधारकांना मालमत्ता कर भरण्याची अंतिम मुदत वाढविण्यासाठी नगरसेविका लीना गरड यांनीही विधानपरिषद सभापती माननीय श्री रामराजे निंबाळकर साहेब यांना पत्र दिले होते. त्या अनुषंगाने आज विधानपरिषद सभापती यांच्या दालनात आमदार श्री बाळाराम पाटील साहेब यांच्या उपस्थितीत मालमत्ता कराच्या विषयावर बैठक झाली.

पण दुर्दैवाने नगर विकास मंत्री समृद्धी महामार्गाच्या कार्यामध्ये व्यस्त असल्याने बैठकीला उपस्थित राहिले नसल्याने निर्णय होऊ शकला नाही. परंतु येत्या काही दिवसात पुन्हा सदरची बैठक लावण्यात येणार आहे . सदर वेळी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने मालमत्ता कर भरण्याची अंतिम मुदत राज्य शासनाकडून नक्की वाढविण्यात येणार आहे असा विश्वास आमदार श्री बाळाराम पाटील साहेब यांनी व्यक्त केला . तसेच येत्या ४ एप्रिल रोजी उच्च न्यायालयात सुद्धा पुन्हा तातडीची सुनावणी होणार आहे . त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाण्याचे काही एक कारण नाही आणि राज्य शासन व उच्च न्यायालय यांच्या सकारात्मक निर्णयाची वाट पहावी.

## निलेश घाटवळ यांच्या नियुक्तीने मुरुड शहरासह बोर्ली-मांडला परिसरातून समाधान

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील तरुण तडफदार व्यक्तिमत्त्व निलेश घाटवळ यांची संजय गांधी निराधार अनुदान योजना तालुका अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आल्याने तालुका शहरासह बोर्ली-मांडला परीसरातून आनंद व समाधान व्यक्त केले जात आहे.

अलिबाग-मुरुड मतदार संघाचे आमदार महेंद्रशेठ दळवी यांचे विश्वासू परिचित निलेश घाटवळ यांचा राजकिय, शैक्षणिक व क्रीडा सामाजिक क्षेत्रात आगळावेगळा ठसा ठसा असून प्रेमळ, शांत स्वभाव, सर्वांना हवेहवेसे वाटणारे व्यक्तिमत्व ! त्यांची नुकतीच संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या तालुका अध्यक्ष पदी नियुक्ती झाल्याबद्दल आप्तेष्ट नातेवाईक चाहते मित्र परिवार तसेच विविध राजकीय पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या आहेत.

आमदार महेंद्रशेठ दळवी यांनी आपल्यावर जो विश्वास दाखवला तो नक्कीच सार्थ करून दाखविन तसेच तालुक्यातील गरिब निराधार लोकांना योजनेचा अधिकाधिक लाभ मिळवून देण्यात प्रयत्नशील राहिन.अशी प्रतिक्रिया निलेश घाटवळ यांनी व्यक्त केली आहे.

## मुस्लिम समाजाच्या वतीने आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । माथेरान**

मुस्लिम जमात माथेरान आणि मॉर्डर्न एज्युकेशनल सोशल अँड कल्चरल ऑर्गनायझेशन यांच्या संयुक्त विद्यमाने येथील महिला आणि लहान मुलांसाठी पहिल्यांदाच मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन दि.२७ मार्च रोजी मदरसा मोहम्मदिया मुस्लिम मोहल्ला माथेरान येथे सकाळी अकरा ते दुपारी तीन वाजेपर्यंत करण्यात आले. त्यास महिलांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.

माथेरान मुस्लिम जमात आणि डॉ. अलमास खान, डॉ. शाहजीन मापारी, डॉ.फरीदा, डॉ.शिरीन पठाण, डॉ. मोज्ञम मोमीन, कुतूबुद्दीन शेख (असिस्टंट) इरम शाह, फायका शेख, कादर खान, फैसुद्दीन शेख हे नामवंत वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. जवळपास दोनशेहून अधिक महिलांनी या सुवर्ण संधीचा फायदा घेतला.



या स्तुत्य उपक्रमास काँग्रेस पक्षाच्या महिला अध्यक्षा वर्षा शिंदे, मीरा फाउंडेशनच्या संचालिका रेखा चौधरी, सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदे, उद्योजक नितीन शहा, माजी नगरसेवक प्रकाश सुतार यांनी भेट देऊन या शिबिरासाठी परिश्रम घेणाऱ्या मुस्लिम समाजाच्या सर्व प्रमुख कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले.आणि दरवर्षी असेच स्तुत्य उपक्रम राबवून गोरगरिबांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करावे असे सांगितले. या सर्व उपस्थित मान्यवरांचा मुस्लिम समाजातील कार्यकर्त्या रिझवाना शेख तसेच अन्य कार्यकर्त्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

## जागतिक रंगभूमी दिन पनवेलमध्ये साजरा ; रंगकर्मींचा कार्यक्रमाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जागतिक रंगभूमी दिनाच्या निमित्ताने जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या सहकार्याने पनवेलमधील रिफ्लेक्शन थिएटर या तरूणांसाठी नाट्य क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थेच्या माध्यमातून अनुभव रंगमंचाचा, रंगकर्मींचा या कार्यक्रमाचे आयोजन आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे करण्यात आले होते.



याप्रसंगी सर्व उपस्थित कलाकार आणि कलारसिकांना शुभेच्छा आणि मार्गदर्शन करण्यासाठी विरोधी पक्षनेते प्रितम जनार्दन म्हात्रे, अनिल गवस (नाट्यकर्मी लेखक-दिग्दर्शक समीक्षक), अंबर हडप (हिंदी आणि मराठी मालिका आणि चित्रपट लेखक), प्रसाद दाणी (मराठी अभिनेते), मंगेश अपराज उपस्थित होते. अनिल गवस यांनी नवोदिताना मार्गदर्शन करताना सांगितले की रंगमंचावर येऊन उभ राहून दोन शब्द बोलण हा आत्मविश्वास जो पुढे जीवनभर पुरतो, यासाठी ही जी रंगभूमी आहे ही रंगभूमी खूप महत्वाची आहे. त्यामुळे आपला हा रंगमंच सतत व्यक्तिमत्व विकास घडवत असतो त्यामुळे सर्वांनी शिक्षण घेणे हे खूप गरजेचे आहे असे ते म्हणाले. अंबर हडप हे बोलले नाटक म्हणजेच जीवन आहे. कारण नाटकामध्ये जशी तालिम होते, रंगीत तालीम होते त्यानंतर प्रयोग होतो परंतु त्यानंतर सुद्धा आपल्याला तालिम करायला हवी असेते, म्हणूनच जीवनामधे तालिम करत राहा. यावेळी सिद्धार्थ साळवी (लेखक-दिग्दर्शक), जितेंद्र तुपे (गायक), राहुल गंद्रे (ध्वनी संयोजक), निशांत ओहळ (संगीतकार), नवनाथ दळवी (अक्षर गणेश चित्रकार), नरेंद्र गायकवाड (पीआरपी, महाराष्ट्र प्रदेश सचिव), गणेश पाटील (पख-वाज वादक), भास्कर वाकडीकर (अभिनेता ऑर्केस्ट्रा आर्टिस्ट), धीरज शिंदे (अभिनेता निर्माता), कपिल आडोळे (छायाचित्रकार) यांनी या कार्यक्रमाला भेट दिली.

## आपत्ती सुरक्षेबाबत जागरूक व प्रशिक्षित असणे काळाची गरज : प्रियदर्शनी पाटील

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

निसर्गाच्या बदलामुळे विविध आपत्तींचा सामना आपल्याला करावा लागत असल्याने प्रत्येक व्यक्ती आपत्ती सुरक्षेबाबत जागरू व प्रशिक्षित असणे, ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या सदस्या प्रियदर्शनी पाटील यांनी नुकतेच येथे केले.

अलिबाग तालुक्यातील चेंढरे ग्रामपंचायत हद्दीत नुकतेच आपत्ती प्रशिक्षण शिबीर पार पडले. यावेळी प्रियदर्शनी पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. व्यासपीठावर आपत्ती व्यवस्थापन तज्ञ जयपाल पाटील, सरपंच स्वाती सतीश पाटील, उपसरपंच प्रणिता म्हात्रे, प्रल्हाद म्हात्रे, योग शिक्षक सुहास गानू, ग्रामसेवक निलेश गावंड उपस्थित होते. आपत्ती व्यवस्थापन तज्ञ जयपाल पाटील यांनी महिलांची स्वयंपाक घरातील गॅस, वीज, गिझर, पाणी यांची सुरक्षा यासह विविध अपघात व अन्य आपत्तीप्रसंगी १०८ सुविधेचा मोफत वापर, ज्येष्ठ व्यक्ती, कामगार यांची सुरक्षा याबाबत प्रात्यक्षिकाद्वारे माहिती दिली.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**



### नावात बदल

मी, **एसके रबीउल इस्लाम** महाराष्ट्र राजपत्र क्र.एम-२११६९७८१ दिनांक १७ फेब्रुवारी, २०२२ रोजी माझे नावात बदल केला आहे. यापुढे मी **मोहम्मद शफी समेर अली शेख** या नावाने ओळखलो जाईल.

**सही/-**
**मोहम्मद शफी समेर अली शेख**



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे : पनवेल येथील खाली सविस्तरपणे नमूद केलेली निवासी सदनिका मिळकत कै.विजया विनायक शिंदे यांचे मालकीची व ताबेकब्जा वहिवाटीतील मिळकत होती व आहे. कै. विजया विनायक शिंदे यांचे दि.०६/०५/२०२१ रोजी पनवेल येथे देहावसान झाले असून त्यांचे मृत्यूपश्चात त्यांस १) दिपाली विनोद धनावडे, २) शलाका सतीश जाधव, ३) हेमंत जगन्नाथ सोनावणे, ४) प्रसाद प्रदीप सोनावणे, ५) चैतन्य प्रदीप सोनावणे, ६) उमेश नारायण जाधव आणि ७) अजित प्रभाकर सोनावणे हेच कायदेशीर वारसदार असून, कै.विजया विनायक शिंदे यांचे दि.०५/०७/२०१७ रोजीच्या अंतिम मृत्यूपत्राप्रमाणे सदरहू निवासी सदनिका मिळकत वर नमूद क्रमांक १ ते ७ यांस कायमस्वरुपी मालकी हक्कांत प्राप्त झाली आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पनवेल, जिल्हा : रायगड**
**सदनिका क्रं.०२, तळमजला, ए/१, कैलास पार्क को.ऑप.सोसायटी, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड, पिन-४१०२०६**

तरी सदरहू वर नमूद मिळकतीबद्दल कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत धरण्यात येईल व वर नमूद लिगटी सदर मिळकतीबाबत त्यांस नमूद मृत्यूपत्रांत दिलेल्या सुचनेनुसार योग्य ती तजवीज करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि.३०/०३/२०२२

**सही/-**
**ॲड.स्वप्नील अरविंद उपाध्ये,**
**ॲडव्होकेट, पनवेल**

**पत्रव्यवहाराचा पत्ता** : सदनिका क्रं.१, पहिला मजला, अनघा अपार्टमेंट को.हौ.सो., जोशी आळी, पटेल हॉस्पिटलजवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६



मा.इंदलकर सो.कोर्ट

**अर्जदाराचे वकील**
**ॲड.मनिष आर. बोहरा**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
क्रिमिनल चौ.अर्ज क्र.१४६/२०२२
ने.ता.१८/०४/२०२२

**नुरमोहम्मद सत्तार मोहम्मद मिय्या**
वय : ३४ वर्षे, धंदा :
रा.विघ्नहर्ता, हाऊस नं.५, सुकापूर,
नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड ... अर्जदार
विरुद्ध
**मा.ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी**
ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद/सुकापूर,
ता.पनवेल, जि.रायगड ... सामनेवाला

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार यांची मुलगी **कु.रिचा नुर मोहम्मद मिय्या** हिचा जन्म दिनांक १५/०४/२०१६ रोजी मौजे : सुकापूर, ता.पनवेल, जि.रायगड येथील राहत्या घरी झालेला आहे.

वरील अर्जदार यांची मुलगी **कु.रिचा नुर मोहम्मद मिय्या** हिचा जन्म दिनांक १५/०४/२०१६ रोजी मौजे : सुकापूर, ता.पनवेल येथे झाला आहे असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदाराने यांनी या मे.कोर्टात जन्मदाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदारांचे जन्माबद्दल कोणासही हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याचे आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकत घेण्याची आहे. जर या कालावधीमध्ये कोणीही योग्य हरकती घेतल्या नाहीत तर मे.कोर्ट अर्जदार यांचा जन्म दाखला देण्याची ताबडतोब कार्यवाही करेल.

आज दि.२६/०३/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व मे.कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल**



मा.मुजावर सो.कोर्ट
**अर्जदाराचे वकील : ॲड.सलमान रशीद पटेल**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.४३६/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०२/०५/२०२२

**१) श्रीमती.विजया नारायण मिठ्ठापेल्ली**
वय : ६३ वर्षे, धंदा : गृहिणी
**२) श्री.प्रतिक नारायण मिठ्ठापेल्ली**
वय : ४३ वर्षे, धंदा : व्यवसाय
**३) श्री.पराग नारायण मिठ्ठापेल्ली**
वय : ४२ वर्षे, धंदा : व्यवसाय
**४) श्री.स्वप्नील नारायण मिठ्ठापेल्ली**
वय : ३९ वर्षे, धंदा : नोकरी
**५) श्री.विशाल नारायण मिठ्ठापेल्ली**
वय : ३८ वर्षे, धंदा : नोकरी
सर्व रा.डी-८/०४, हरी निवास, उत्कर्ष को.ऑप.
हौ.सोसायटी, सेक्टर क्र.११, पाण्याचे टाकीच्या मागे,
खांदा कॉलनी, नवीन पनवेल (वेस्ट) ४१०२०६ ... अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ ते ५ चे वडील **कै.नारायण भुमय्या मिठ्ठापेल्ली** हे **दि.२९/०९/२०१९** रोजी एम.जी.एम. हॉस्पिटल कामोठे येथे मयत झालेले आहेत. तसेच **कै.नारायण भुमय्या मिठ्ठापेल्ली** यांच्या खुद्द मालकीची, नावे असलेली तसेच प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णनाची सदनिका आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**डी-८/०४, तळमजला, उत्कर्ष को.ऑप.हौ.सोसायटी, क्षेत्र ४०.९५ चौ.मीटर, प्लॉट क्र.१०, सेक्टर क्र.११, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

सबब सदर मिळकतीबाबत **कै.नारायण भुमय्या मिठ्ठापेल्ली** यांचे कायदेशीर वारस असल्याचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी नामदार कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर वारस दाखल्याच्या कामी कोणत्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्यात मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभांत वारसदाखला दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.२९/०३/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.मुजावर सो.कोर्ट

**ॲड.एच.जे.शेळके**
**अर्जदारातर्फे वकील**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.१८८४/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.३०/०४/२०२२

**१) श्री.अनंता हसुराम माळी**
वय : ५० वर्षे, धंदा : शेती
**२) श्री.गजानन हसुराम माळी**
वय : ६४ वर्षे, धंदा : शेती
**३) श्री.प्रमोद हसुराम माळी**
वय : ४६ वर्षे, धंदा : शेती
सर्व रा.सावळे, पो.रसायनी, ता.पनवेल, जि.रायगड
**४) सौ.रंजना लक्ष्मण पाटील**
वय : ४८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.खांदा कॉलनी, ता.पनवेल, जि.रायगड
**५) सौ.स्मृती सुभाष ठाकूर**
वय : ५९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.पोदी, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
**६) सौ.सारिका शिरिष ठाकूर**
वय : ४४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
**७) ग.भा.सिताबाई हसुराम माळी**
वय : ७३ वर्षे, धंदा : घरकाम
रा.सावळे, पो.रसायनी, ता.पनवेल, जि.रायगड ... अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ ते ६ यांचे वडील व अर्जदार नं.७ चे पती कै.हसुराम भागाजी माळी हे दि.०६/०७/२०२१ रोजी मौजे : सावळे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले असून कै.हसुराम भागाजी माळी यांची आई देखील पूर्वीच मयत झालेली आहे. कै.हसुराम भागाजी माळी यांचे नावाने मौजे : वावेघार, ता.पनवेल, जि.रायगड येथील हॉटेल आनंद करिता जिल्हाधिकारी रायगड यांजकडून तारीख २४/०६/१९९४ रोजी हॉटेल परवाना घेतलेला आहे. सदर परवाना नंबर एफ.एल.-३/१४६/२०२१-२०२२ असा आहे. सदर परवान्याची रितसर नुतनीकरणाची फि मा.जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांजकडून भरून नियमितपणे सदर परवाना नुतनीकरण करून घेत असत. आजमितीस सदर परवाना नंबर एफ.एल.-३/१४६/२०२१-२०२२ पर्यंत अस्तित्वात आहे.

वरील परवाना संदर्भात अर्जदार यांच्या नावाने वारस दाखला देण्याबाबत कुणाचीही हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. सदरच्या नोटीसीस मुदतीत हरकत न आल्यास वारस दाखला अर्जदारांच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.२९/०३/२०२२ रोजी कोर्टाच्या सही-शिक्क्याने दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# कुडगाव व मोर्बा घाटात संरक्षण कठड्याची मागणी

## माणगाव - दिघी या नवीन रस्त्यामुळे वाहनांचा वेग वाढला

**दै.रायगड नगरी । शिस्ते**

माणगाव-दिघी मार्गावरील कुडगाव ते वेळास भरणा नाका व मोर्बा येथील वळणदार घाटात संरक्षक कठडे नसल्याने येथून जाताना वाहनधारकांना जीव मुठीत घेऊन जावा लागतो. त्यामुळे वळणाकृती रस्त्याच्या दुतर्फा संरक्षण कठडे बांधणे गरजेचे आहे. दिघी बंदरात मालवाहतूक करणाऱ्या वाहनचालकांना याचा अंदाज येत नसल्याने एखादी मोठी दुर्घटना होऊ शकते. घोणसे घाट येथे वळणावर दर पंधरा दिवसांत अपघात घडत आहेत.



श्रीवर्धन तालुका हे प्रसिद्ध पर्यटन स्थळ आहे. दिघी येथून थेट जंजिरा केला तसेच फेरी बोटीने मुरुड व अलिबाग याठिकाणी जाता येते. याशिवाय दिघी बंदरातून कमी अधिक प्रमाणात मालवाहतूक होत असते त्यामुळे या रस्त्यावर नेहेमीच वाहनांची वर्दळ असते. ठिकठिकाणी दुचाकी-चारचाकी वाहनांना वळणे घेत असताना गाडीचा ताबा सुटण्याची शक्यता अधिक असते. या मार्गावरून येत असताना वाहने अतिशय धोकादायक वळणे घेत असताना दिसून येतात.

सध्या महाराष्ट्र रस्ते विकास मंडळाकडून दिघी ते माणगाव या रस्त्याचे काँक्रीटीकरण होत असून काम अंतीम टप्प्यात आले आहे. काही ठिकाणी संरक्षण भिंत बांधण्यात आली आहे मात्र काही वळणावर तातडीने संरक्षण कठडे बसविणे गरजेचे आहे; अन्यथा मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येणार नाही. मोर्बा घाट हा महत्त्वाचा मार्ग असून, याठिकाणी तातडीने संरक्षण कठडे नसल्याने हा मार्ग धोकादायक बनला आहे. याबाबत अधिक माहितीसाठी महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाचे अभियंता सचिन निफाडे यांच्या शी संपर्क केला असता संपर्क झाला नाही.

## संक्षिप्त...

### अब्बासअली हुसेन पिरभोय यांच्याकडून गरजवंतांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मध्ये लॉक डाऊन सारख्या महाभयंकर काळात खूपच हलाखीची परिस्थिती निर्माण झाली होती त्यावेळेस अनेक गराजवंतांना मदतीचा हात देण्यासाठी येथील हॉटेल वे साईड इन चे मालक अब्बासअली हुसेन पिरभोय यांनी सढळ हाताने जीवनावश्यक वस्तूंची मदत केली होती त्यामुळे अनेकांना त्यावेळी मोठा आधार मिळाला होता.


नुकताच लॉक डाऊनच्या महामारीचा कार्यकाळ संपुष्टात आल्यानंतर सुध्दा अब्बासअली हुसेन पिरभोय यांनी आपल्या वडिलोपार्जित दातृत्वाच्या सवयीमुळे निर-ाधार लोकांना उदरनिर्वाह साठी थोड्याशा प्रमाणात का होईना जीवनावश्यक वस्तूंच्या वाटप करीत आहेत. दि.२७ मार्च रोजी हॉटेलच्या प्रांगणात विधवा महिलांना तांदूळ, खाद्यतेल पाकीट, पोहे, डाळ, गव्हाचे पीठ व इतर सामानाचे वाटप केले. पुढील दोन महिन्यांसाठी सुध्दा अशाचप्रकारे जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात येणार असल्याचे अब्बासअली हुसेन पिरभोय यांनी सांगितले. माथेरान मधील हॉटेल धारकांमध्ये अब्बासअली हुसेन पिरभोय हे एकमेव मालक आहेत की ज्यांनी निस्वार्थीपणे गोरगरिबांना, गराजवंतांना, निराधार विधवा महिलांना ,कष्टकरी हातगाडी चालकांनामोफत भोजनाची व्यवस्था केली होती त्याचप्रमाणे शाळेतील विद्यार्थ्यांना सुध्दा दरवर्षी शालेय साहित्याचे वाटप करत आहे. ज्या मुली शिवणकाम करण्यासाठी इच्छुक आहेत त्यांच्यासाठी शिवणकाम क्लासेस मोफत उपलब्ध करून देणार आहेत जेणेकरून त्या मुली आपल्या स्वतः च्या पायावर उभ्या राहून आपल्या कुटुंबाला आधार देऊ शकतात.माथेरान मध्ये अनेक गडगंज धनाढ्य मंडळी, हॉटेल धारक वास्तव्यास आहेत परंतु गराजवंतांना कुणीही मदत करण्यासाठी पुढाकार घेताना दिसून येत नाहीत. अनेक विद्यार्थ्यांना परिस्थिती अभावीमहाविद्यालयात शिक्षण घेता येत नाही अशा ठराविक विद्यार्थ्यांसाठी एक पाऊल पुढे टाकल्यास गोरगरीब विद्यार्थ्यांना मोठा आधार मिळू शकतो. याकामी अब्बासअली हुसेन पिरभोय हे पुढाकार घेणार आहेत.यासाठी त्यांना हॉटेलचे मॅनेजर मेहबूबभाई तसेच हॉटेल मधील अन्य कामगार वर्ग सहकार्य करीत असतात.अब्बासअली यांच्या या निस्वार्थी सेवेबद्दल त्यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.



## ऐन उन्हाळ्यात चौक गावात पाणी पुरवठा योजनेचा खेळ खंडोबा

**दै.रायगड नगरी । चौक**

चौक गावातील मोरवे धरणातून पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनी मुळे कर्जत-- पनवेल नवीन रेल्वे लाईनला अडथळा निर्माण होत असल्याने दिनांक २२ मार्च ते दि.२६ मार्च या दरम्यान नियोजनबद्ध शटडाऊन घेऊन यादरम्यान ते बाजूला घेण्याचे काम करण्यात येणार होते. सदर काम करण्यापूर्वी चौक ग्रामपंचायतीने गावात स्पीकर दवंडी द्वारे सर्व परिसरात रिक्षा फिरविलि होती.



त्यामुळे या तीन दिवसात पाणी नसल्याने गृहिणी, हॉटेल व्यवसायिकांनी तीन दिवस पुरेल एवढे पाणी साठवण केली होती,काम ठरल्याप्रमाणे वेळेत उरकले देखील परंतु पाण्याची जलवाहिनी पूर्ववत करताना त्याकडे काळजीपूर्वक न पाहता पाणी सोडण्यात आले पाण्याचा प्रवाह एवढ्या मोठ्या प्रमाणात होत असतो हे ठाऊक असताना देखील पुढील परिणामांचे विचार न करता पाणी साठवण्यासाठी टाकीत दिनांक २६ ला सायंकाळी सोडण्यात आले पाणी प्रवाहामुळे नवीन काम करण्यात येणारे जलवाहिनी हा प्रवाह प्रेशर सहन न करू शकल्यामुळे त्या जलवाहिनीला तडे जाऊन ती पूर्णपणे निकामी झाली.आता तिचे काम प्रगतिपथावर पूर्ण करण्यात येत असून नवीन जलवाहिनी भोवती आरसीसी चे काँक्रिट करण्यात येत आहे त्यानंतर पाणीपुरवठा सुरळीत सुरू होईल. एन उन्हाळ्याच्या तोंडावर पिण्याच्या पाण्याचे अत्यंत गरज असताना या कामामुळे चौक परिसर व आजूबाजूच्या गावांना होणारे पाणीपुरवठा गेली अनेक दिवस बंद झाल्यामुळे संपूर्ण गाव पाण्या साठी विहिरी, नदी, तलावावर फिरताना दिसून येत होता.

पाणी जीवनावश्यक असल्याने गृहिणीचे सर्व गणित चुकले. भर उन्हात पाण्यापासून वंचित राहिल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला त्यानंतर रेल्वे प्रशासन तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिकांनी पाण्याचा टँकरने संपूर्ण परिसरात पाणीपुरवठा सुरू केला मात्र एक टँकर संपूर्ण परिसरात फिरून पाणी देणे शक्य नसल्याने रात्री एक ते दोन वाजेपर्यंत पाण्याची वाट बघत बसावे लागत आहे पाण्याचा टँकर येताच सर्व नागरिक आपापली पाणी साठवण्यासाठी लागणारी भांडी गोळा करून टँकरच्या मागे धावताना पाहायला मिळाली.बरेच वर्षांपासून असणारी पाण्याची व्यवस्था यापुढे अखंड चालू ठेवणे हे देखील कौशल्य म्हणावे लागेल.

## चालकाच्या निष्काळजीपणामुळे ट्रेलरच्या चाकांनी घेतला पेट

**दै.रायगड नगरी । उरण**

दिघोडे ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यावरुन मार्गक्रमण करणाऱ्या मालवाहू ट्रेलरच्या चालकांच्या निष्काळजीपणामुळे ट्रेलरच्या मागच्या भागातील टायरने अचानक पेट घेतल्याची घटना भर दुपारी घडली आहे. परंतू तेथे असलेल्या एका रिफर यार्ड मधील अग्निशामन दलाच्या जवानांनी तत्काळ धाव घेत ट्रेलरला लागलेली आग विझविण्याचा प्रयत्न केला. त्यामूळे पुढील अनर्थ टळला आहे.

दिघोडे ग्रामपंचायत हद्दीत मोठ्या प्रमाणात कंटेनर यार्डचे जाळे निर्माण झाले आहे. अशा मालवाहू यार्ड मध्ये अनेक वेळा आगी लावण्याच्या दुदैवी घटना घडल्या आहेत. त्यात दिघोडे- रानसई धरणाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला असलेल्या आर्यन यार्ड जवळ ट्रेलरच्या चालकांच्या निष्काळजीपणामुळे पाठीमागील टायरना अचानक आग लागण्याची घटना घडली. सदर आग अग्निशामन दलाच्या जवानांनी विझविण्याचा प्रयत्न केला आहे.सदैवाने जिवितहानी किंवा वित्तहानी झाली नाही.



## प्रमिला घोसाळकर यांच्या निधनाने पोरकेपणा जाणवतोय : श्रध्दा भिडे

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

पन्हळघर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाच्या जेष्ठ सदस्या आणि लोणेरे निवासी प्रमिला घनश्याम घोसाळकर यांचे दि.२२ मार्च २०२२ रोजी निधन झाले. प.प.शि.प्र. मंडळाचे अध्यक्ष घनश्याम घोसाळकर यांच्या त्या पत्नी होत. त्यांचा निधनाचे वृत्त समजताच त्यांचे सहवासात आलेल्या प्रत्येकालाच एक वेगळा पोरकेपणा जाणवल्याची प्रतिक्रिया माणगांव को.म.सा.प.च्या जेष्ठ सदस्या श्रध्दा भिडे यांनी व्यक्त केली आहे.



लाघवी व्यक्तीमत्व लाभलेल्या कै. प्रमिला घोसाळकर यांच्या जुन्या आठवणींना उजाळा देताना त्या म्हणाल्या, १९८६ साली, मी डीएड कॉलेज माणगांव येथे नोकरीस लागले ती नोकरी सोडून १९८७ साली जे.बी. सावंत हायस्कूल लोणेरे येथे रुजू झाले. येथे जवळच राहणाऱ्या प्रमिला मावशी यांच्या घरी माझे जाणे वारंवार व्हायचे. पहिल्या दिवसापासून मावशींचे भारदस्त मराठमोळे व्यक्तिमत्व माझ्या मनात भरले. त्यांच्या घरी आल्या-गेल्या प्रत्येकाचे प्रेमपूर्वक आदारातिथ्य होत असे. हळदीकुंकू समारंभ असो किंवा पंचाहत्तरीचा कार्यक्रम, मावशीच्या घरचे आमंत्रण ठरलेले असे. त्या प्रत्येकाची विचारपूस अगत्याने करायच्या. दारचा कढीपत्ता, तांब्याभर ताक मावशीच्या घरुन शेजारीपाजारी जायचा. आजु-बाजुच्या प्रत्येक लेकी सुनांच्या चेहऱ्यावर त्या मायेने हात फिरवत. एवढेच नव्हे तर आमच्या वाढदिवसांचे औक्षण त्यांच्या घरीच व्हायचे. भरभरून आशीर्वाद आणि खाऊही मिळायचा. मावशी बद्दल बोलण्यासाठी शब्द तोकडे आहेत,मावशीं कडे मनःशांती होती, ती त्यांना मोक्ष पदा पर्यंत नक्की नेईल. असे भावोद्गार भिडे बाईंनी व्यक्त केले आहेत.


## पनवेल महानगरपालिका
### मालमत्ता कर विभाग

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ,चे प्रकरण ११ व कराधान नियम ८, अन्वये ५ दि.०१ ऑक्टोबर २०१६ पासून ते सन २०२०-२१ या पाच वर्षाकरीता सुधारित कर आकारणीची अंतिम यादी जाहीर प्रसिध्दी बाबत सुचना नोटीस.**

### जाहीर सूचना

**पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती कार्यालय 'क' वाढीव हद्दीतील कामोठे जवाहर इंडस्ट्रीज क्षेत्रातील सर्व मालमत्ता धारकांना या जाहीर नोटीस द्वारे कळविणेत येते की,**

**आपल्या भोगवट्यातील इमारतीची व भुखंडाचे तपासणी व करमुल्यांकन करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण ११ नगरपालिका कराधान कलम क्र.१२७,१२८अ, १२९,१२९ अ, १३१, १३२ व प्रकरण ८ कराधान नियम ८ ते १९ अन्वये पनवेल महानगरपालिका वाढीव हद्दीतील कामोठे जवाहर इंडस्ट्रीज क्षेत्रातील सर्व मालमत्तांना पुर्वलक्षी प्रभावाने म्हणजेच दि. ०१ ऑक्टोबर २०१६ पासून ते सन २०२०-२१ या पाच वर्षाकरीता इमारतीचे व भुखंडाचे कर निर्धारणाकरीता लागू करण्यात आलेल्या अंतिम करमुल्यांकन याद्यांची प्रसिद्धी दि.२८/३/२०२२ रोजी करण्यात येत आहे.**

**पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती कार्यालय 'क' वाढीव हद्दीतील कामोठे जवाहर इंडस्ट्रीज क्षेत्रातील संपुर्ण मालमत्तांची (इमारती व खुले भूखंड) मालकी असलेल्या मालमत्ता धारकांना / भोगवटा धारकांना जाहीर प्रसिद्ध केलेली अंतिम करमुल्यांकन यादी प्रभाग समिती कार्यालय 'क' स्थळ :- प्रभाग समिती ('क') कार्यालय, कराडी समाज हॉलजवळ, सेक्टर क्र.१४, कामोठे या कार्यालयात पाहणीकरिता कार्यालयीन वेळेत, सुट्टीचे दिवस वगळता पाहणीकरीता उपलब्ध आहेत.**

**तसेच सुधारित चालू मागणी व मूळ ग्रामपंचायत नोंदणी मालमत्तांची सन २०२०-२१ पर्यंत वसुली व थकबाकी यांचे समायोजन करुन अश्या मालमत्ता धारकांना सन २०२१-२२ करीता सुधारीत देयक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण ८ नियम ३०, ३९ व ४० व प्रकरण ११ नगरपालिका कराधान कलम क्र.१२९ अ अन्वये देयके यानंतर बजावण्यात येईल.**

संपर्क अधिकारी :-
१) सुनील मानकामे (सहा-आयुक्त -मालमत्ता कर विभाग)
भ्रमणध्वनी क्र :- 1800-5320-340
फोन नं. 022-27458040/41/42
ई-मेल - pmc.tax2016@gmail.com

सही/-
(गणेश देशमुख)
आयुक्त
पनवेल महानगरपालिका


## 'माझी वसुंधरा' अंतर्गत सौरऊर्जेविषयी जनजागृतीपर शालेय विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

'माझी वसुंधरा' उपक्रमाअंतर्गत सौरऊर्जे ची माहिती देणारा कार्यक्रम आज पनवेलमधील कोळीवाड्यातील महापालिकेच्या कोळेश्वर विद्या मंदिर, शाळा क्रमांक ४ येथे घेण्यात आला. नेव्ही ब्ल्यू एनर्जीचे हिरेन सुतार यांनी यावेळी शालेय विद्यार्थ्यांना सौरऊर्जेचे महत्व सांगितले.

आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिकेमध्ये 'माझी वसुंधरा' उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमांतर्गत आज कोळेश्वर विद्या मंदिर येथे सहावी आणि सातवीच्या मुलांना सौरऊर्जेपासून विद्युत ऊर्जा तयार करणे, सौरऊर्जेची कार्यतत्वे, सोलार पॅनेलची माहिती, सौरऊर्जेचे पर्यावरणाच्या दृष्टीने होणारे फायदे, विविध ठिकाणी त्याचा उपयोग करून वीज बिल कशा पध्दतीने कमी करता येऊ शकते हे उदाहरणासहित पटवून सांगितले. सौरऊर्जे विषयीची ही माहिती पॉवरपाईंट प्रेझेटेंशनच्या माध्यमातून मुलांना देण्यात आली. याकार्यक्रमात मुलांनी आपल्या मनातील विविध शंका विचारून त्याचे निरसन केले. या कार्यक्रमासाठी उपायुक्त कैलास गावडे आणि शिक्षणाधिकारी बाळासाहेब चिमणे यांचे सहाकार्य लाभले. यावेळी कोळेश्वर विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका सुमन हिलम, शाळेच्या शिक्षिका,विद्युत विभागाचे कर्मचारी, उपस्थित होत्या.




सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना
### (हक्कसोड पत्राबाबत)

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **हक्कसोडपत्राची जाहीर सूचना.**

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तींची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तीचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ता. पनवेल, जि. रायगड | | | | | | | | |
| १ | तळोजा ४६४ | पाचंनद ११ | २६३/१ | ०-२३-० | २०० चौ.मी. | भुखंड क्र. २२, सेक्टर-१७, क्षेत्र २०० चौ.मी. | **कै. महमद इब्राहिम अलीसाहेब पटेल उर्फ पाटील (मयत) यांचे वारस**<br>१) अब्दुल रेहमान मोहमद इब्राहिम पटेल<br>२) अब्दुल लतिफ मोहमद इब्राहिम पटेल<br>३) अब्दुल गणी मोहमद इब्राहिम पटेल<br>४) मोहमद इस्माईल मोहमद इब्राहिम पटेल<br>५) मोहमद अनवर मोहमद इब्राहिम पटेल (मानसिक रुग्न) तर्फे पालन कर्ता मुलगा उसामा अनवर पटेल<br>६) सफिबाई अब्दुल गफुर खान<br>**७) कै. मुस्ताक अहमेद मोहमद इब्राहिम पटेल (मयत) यांचे वारस**<br>७.१) करीमा मुश्ताक अहमद पटेल<br>७.२) नुर अहमद मुश्ताक अहमद पटेल<br>७.३) मोहमद जुबेर मुश्ताक अहमद पटेल<br>७.४) यासीन मुश्ताक अहमद पटेल<br>७.५) इलीयास मुश्ताक अहमद पटेल<br>७.६) सामिना जाहुर पटेल<br>**८) कै. बशीर अहमद मोहमद इब्राहिम पटेल (मयत) यांचे वारस**<br>८.१) श्रीमती रुकसाना बशीर अहमद पटेल<br>८.२) श्री. लुकमान बशीर अहमद पटेल<br>८.३) श्री. उमेर बशीर अहमद पटेल<br>**९) कै. खादीजा अब्दुल रशिद खान (मयत) यांचे वारस**<br>९.१) श्री. बिलाल अब्दुल रशिद खानबुबेरे<br>हे एकपक्षी असून हक्कसोडपत्र लिहून देणारे आहेत. | सह. दुय्यम निबंधक, पनवेल-२, दस्त क्र. ३६८३/२०२२, दि. १०.०३.२०२२ रोजीचे हक्कसोडपत्र प्रमाणे **१) श्री. सुफियान बशीर अहमद पटेल** यांना हक्क व हितसंबध प्रदान केलेले आहेत. |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकार**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/४८७/२०२१-२२